जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४९९ दिनांक - २६/११/२०२४**

गुन्हे शाखा, युनिट-०४, पुणे शहर

## रात्रीची घरफोडी करणा-या आरोपी कडुन तीन गुन्हे उघडकीस

दि.२५/११/२०२४ रोजी युनिट-४ कडील पोलीस अंमलदार येरवडा पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असताना पोलीस अंमलदार भरत गुंडवाड, देविदास वांढरे, वैभव रणपिसे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,काल रात्री चैतन्य नगर धनकवडी पुणे येथे घरफोडी करणारा शिवासिंग बावरी हा इसम संगमवाडी ट्रॅव्हल पार्किंगचे जवळ एका गाडी मध्ये बसुन कोणाची तरी वाट पहात आहे अशी खबर मिळाली.

खबरी प्रमाणे लागलीच स्टाफसह त्या ठिकाणी गेलो तेथे बातमीतील इसमाचा शोध घेतला असता स्टाफला तो संगमवाडी ट्रॅव्हल पार्किंग जवळ एका गाडी मध्ये बसलेला दिसला. लागलीच त्यास स्टाफच्या मदतीने ताब्यात घेतले.त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **शिवासिंग आमिरसिंग बावरी वय २४ वर्षे, रा.कामतघर रुम नं.७, दुर्गामाता मंदीराचे मागे भिवंडी जि. ठाणे** असे असल्याचे सांगितले. त्यास विश्वासात घेवुन बातमीतील घरफोडी बाबत तपास केला असता त्याने त्याचा साथीदार नामे विजयसिंग जुनी रा. पिसवली, कल्याण व त्याच्या आणखी एका मित्र यांच्या सोबतीने त्याचे ताब्यात मिळालेल्या गाडीतुन सदरची घरफोडी केल्याचे सांगितले. लागलीच सहकारनगर पो.स्टे. येथे संपर्क करुन माहीती घेतली असता त्याबाबत सहकारनगर पो.स्टे. येथे गु.र.नं. ३९९/२०२४ भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४),३०५ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहीती मिळाली. त्याचे ताब्यातील गुन्हया मध्ये वापरलेली स्कॉर्पिओ गाडी रु.५,००,०००/- किं.ची गुन्हयाच्या पुराव्या कामी पंचनाम्याने जप्त करणेत आली आहे.त्याचे कडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

१) सहकारनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३९९/२०२४ भा.न्या. सं. कलम ३३१(३), ३३१(४), ३०५
२) मार्केट यार्ड पोलीस ठाणे गु.र.नं. १८६/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४)
३)रबाळे पोलीस ठाणे नवी मुंबई येथेगु.र.नं. ४३६/२०२४ भा.न्या. सं. कलम ३०३(२)

वरिल प्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले असून सदर आरोपी मुंबई येथे १० ते १२ गुन्हयामध्ये पाहीजे आरोपी आहे. सदर आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाई करीता सहकारनगर पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सहकारनगर पोलीस ठाणे करीत आहे

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेशकुमार,मा.पोलीस सह आयुक्त श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे, मा. सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री.राजेंद्र मुळीक,वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, युनिट-४ यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक, वैभव मगदुम,दिगंबर चव्हाण, सहा.पो.फौ. प्रविण राजपुत, यस्मीन सय्यद, पोलीस अंमलदार हरिष मोरे, विठ्ठल वाव्हळ, अजय गायकवाड, प्रविण भालचीम,संजय आढारी, विशाल गाडे, विनोद महाजन, एकनाथ जोशी, नागेशसिंग कुंवर, जहांगिर पठाण, मनोज सांगळे, वैभव रणपिसे, देविदास वाढंरे, राहुल परदेशी, सुभाष आव्हाड, भरत गुंडवाड, विशाल ईथापे, महिला पोलीस अंमलदार रोहिणी पांढरकर, मयुरी नलावडे, चालक सहा.पो. फौ.शितल शिंदे यांनी केली आहे.

